# जालना शहरातील लोकसंख्या वाढीचा सामाजिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास

**श्री. राजीव गंगाधर देहाडे**
स्व.श्री.लालचंदजी सकलेचा स्कूल, जालना
मोबाईल : ९६०४०५५८५१

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून भूगोल या विषयामध्ये प्रामुख्याने प्राकृतीक पर्यावरणाच्या अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व होते परंतू काळ जसा पुढे-पुढे जाऊ लागला तशी भूगोलामध्ये मानवाच्या अभ्यासाला सुरुवात होऊन प्राकृतिक पर्यावरणावर मानवाचे होणारे परिणाम याबाबत अभ्यास होऊ लागला. या अभ्यासामधून भूगोलामध्ये लोकसंख्या संसाधनाचा अभ्यास एका घटक रुपात होऊ लागला. या अभ्यासाला फ्रेंच भूगोल शास्त्रज्ञांचे मोठ्या प्रमाणात समर्थन मिळून यातूनच भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून 'मानवी भूगोलचा जन्म झाला. सामाजिक शास्त्रच्या रूपात भूगोलाच्या नवीन शाखा स्वतंत्र अभ्यास क्षेत्र म्हणून वेगळ्या होत गेल्या. आर्थिक भूगोल, मानवी भूगोल, राजकीय भूगोल यामध्ये मानव आतापर्यंत सहअभ्यासाचा विषय राहिला, आता त्याला स्वतंत्र अभ्यासाचा विषय मानून अभ्यास करणे गरजेचे झाले आहे. यातूनच लोकसंख्या भूगोल या भूगोलाच्या नवीन शाखेचा उदय झाला.

प्राचीन काळापासून लोकसंख्येचा प्रश्न विज्ञानाच्या विविध शाखांना आकर्षित करणारा आहे. प्लेटो आणि अरिस्टॉटल यांचे नगराच्या आकारासंबंधी संतुलित लोकसंख्येचा विचार लोकसंख्येच्या अध्यायामध्ये महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत अनेक युरोपीय भूगोल विचारवंत भूमीची सीमित माहिती आणि सीमित लोकसंख्येमुळे फक्त लोकसंख्येच्या वृत्तीचे अध्ययन करत राहिले. कालांतराने काळाच्या ओघात युरोप आणि आशिया खंडात व्यापार वाढल्यामुळे या अध्ययनामध्ये बदल होऊ लागला. सामाजिक आणि आर्थिक विज्ञानाच्या अनेक लेखकांनी अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जीवनोपयोगी साधनांवर लोकसंख्येची निर्भरता कशी अवलंबून असते यावर अभ्यास करण्यास सुरुवात केली. याच काळात म्हणजेच १७९८ माल्थस यांनी 'लोकसंख्या सिद्धांत' या निबंधाच्या प्रकाशनासोबतच लोकसंख्येच्या विस्तृत अभ्यासाकडे विद्वानांचे लक्ष आकर्षित केल्याने लोकसंख्येचे अध्ययन होऊ लागले.

सामाजिक शास्त्रात लोकसंख्येचा अभ्यास हा भूगोल शास्त्रज्ञांचा प्रमुख विषय झाला आहे; तथापि विविध विषयाचे अध्ययन क्षेत्र भिन्न आहे, परंतु लोकसंख्येच्या ऐतिहासिक आणि क्षेत्रिय विश्लेषणात प्रत्येक विषयाचे महत्त्वाचे योगदान आहे. भूगोल शास्त्रांमध्ये लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास सुरुवातीच्या काळापासून 'मानव भूगोल' शास्त्रज्ञांचे आकर्षण राहिला आहे. भौगोलिक घटकांच्या अध्ययनाला सुरुवातीपासूनच दोन भागांमध्ये विभाजित करण्यात आले होते; परंतु मानवाचे भौगोलिक अध्ययनात किती महत्त्वाचे स्थान आहे. या प्रश्नावर भूगोल शास्त्रज्ञांमध्ये नेहमी मतभेद राहिले, कारण सुरुवातीस भूगोल प्राकृतिक विज्ञान मानले जात होते; म्हणूनच त्यांच्या अभ्यासात भूमीला प्रमुखकता प्रदान केली गेली होती; परंतु भूगोल एक सामाजिक शास्त्र अशी विचारधारा प्रगल्भ झाल्यानंतर भौगोलिक अभ्यासामध्ये लोकसंख्या आणि लोकसंख्येशी संबंधित समस्यांचे अध्ययन करण्यात मोठ्या प्रमाणात वृद्धी झाली. अशा प्रकारे भौगोलिक अध्ययनात प्राकृतिक पर्यावरणामध्ये मानवास प्राधान्य देण्यात येऊ लागले संयुक्त राज्य अमेरिका Jeferson (१९०९), Becker (१९२८) आणि Mekarti (१९४२) यांनी लोकसंख्येच्या

अभ्यासावर अनेक शोध निबंध लिहिले. ब्रिटनमध्ये Aurther Gedes (१९४१), फ्रान्समध्ये Vidal-dela Blache, Jean Brunch, Macksmilian Psore यांनी मानवाला भौगोलिक अध्ययनाचा केंद्रबिंदू मानले. १९५३ साली Trewartha यांनी अमेरिकन भूगोल परिषदेत 'लोकसंख्या भूगोल' भूगोलाला एका नवीन शाखेच्या रूपात प्रस्तुत केले. म्हणजेच भूगोलात 'लोकसंख्या भूगोल' या नवीन शाखेचा उदय झाला. १९५३ हे साल भूगोलामध्ये विभाजक वर्ष म्हणून ओळखले जाते. आधुनिक काळात संसाधन असणाऱ्या लोकसंख्या भस्मासुरामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यात प्रामुख्याने झोपडपट्ट्यांचे वाढते प्रमाण, बेरोजगारी, गुन्हेगारी, जल प्रदूषण, वायू प्रदूषण, भू प्रदूषण, जंगलतोड अशा कितीतरी पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. "जालना शहरातील लोकसंख्या वाढीचा सामाजिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास" ही समस्या संशोधनासाठी निश्चित केली आहे.

**अभ्यास क्षेत्राची निवड** :

भौगोलिकदृष्ट्या जालना जिल्हा मध्यभागी येतो. जालना जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार $19^{0}$'1 उत्तर ते $23^{0}$3' उत्तर अक्षवृत्त आणि $75^{0}$4' पूर्व ते $76^{0}$4' पूर्व रेखावृत्त या दरम्यान झालेला आहे. जालना जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर जळगाव जिल्हा, पूर्वेस बुलढाणा व परभणी जिल्हा, दक्षिणेकडे बीड जिल्हा व पश्चिम बाजूस औरंगाबाद जिल्हा वसलेला आहे. 2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 7,727 चौकिमी एवढे असून, ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत 2.51 टक्के एवढे आहे व याच जनगणनेनुसार जालना जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 19,58,483 एवढी आहे, तर लोकसंख्येची घनता दर चौ किमीला 171 इतकी असून शहरी लोकसंख्येची घनता दर चौकिमीला 3018 एवढी आहे. जिल्ह्यामध्ये एकूण आठ तहसीलींचा समावेश होत असून त्या पुढीलप्रमाणे आहेत. जालना, बदनापूर, जाफराबाद, भोकरदन, परतूर, मंठा, अंबड, घनसावंगी

**संशोधन समस्याची गरज** :

मानवाने नैसर्गिक पर्यावरणातून उपलब्ध साधनांचा वापर करुन अनेक प्रकारचे त्याज्य पदार्थ कोणताही विचार न करता पर्यावरणात सोडले आहेत. त्याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे अविघटनशील पदार्थ कृत्रिमरीत्या निर्माण करून त्याचा उपयोग घेतला व त्याचा केर-कचरा सुद्धा कोणताही विधी निषेध न मानता पर्यावरणात टाकला. त्यातूनच पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

लोकसंख्या भरमसाठ वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणात शहरे, झोपडपट्ट्या, गिरण्या, कारखाने वाढत गेले. सुमारे ७५० कोटी लोकसंख्येची उपभोग वाढला. संसाधनाचा अनिर्बंध उपयोग घेण्यासाठी निसर्गाच्या यंत्रणेतील मानवाचा हस्तक्षेप वाढला. पर्यावरणात असंतुलन वाढले व पर्यावरणातील घाण व केरकचरा वाढल्याची परिणीती म्हणजे प्रदूषण समस्या होय.

जालना शहरात उद्योगधंद्यांचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले आहे; परिणामी या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. सहज आणि कमी दरात मिळणारे मजूर यामुळे दिवसेंदिवस कारखान्यांचे प्रमाण या ठिकाणी वाढतच आहे. गावाकडील लोकांचे स्थलांतर शहरात होत असल्याने झोपडपट्ट्यांचे वाढते प्रमाण, बेरोजगारी, गुन्हेगारी, कारखान्यातील व झोपडपट्ट्यातील सांडपाणी, टाकाऊ पदार्थ यामुळे जालना शहरातील पर्यावरण दूषित झाले आहे. म्हणूनच जालना शहरातील लोकसंख्या वाढीचा सामाजिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास ही समस्या संशोधनासाठी निवडलेला आहे.

**संशोधन समस्याचे महत्व** :

आज मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. पर्यावरणात निर्माण होणाऱ्या अथवा निर्माण करून टाकणाऱ्या पदार्थामुळे पर्यावरण दूषित झाले आहे. थोडाफार अपवाद वगळता सर्व प्रदूषके मानवाने निर्माण केले आहेत. मानवी श्रवण क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेच्या अथवा तीव्रतेचा आवाजामुळे ध्वनी

प्रदूषण निर्माण होते. अशाच प्रकारे मानवाने जलप्रदूषण व भू-प्रदूषण मोठ्या प्रमाणात निर्माण केले असल्याने पर्यावरणात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे गुन्हेगारी, बेकारी, झोपडपट्ट्या, सामाजिक स्थैर्य अशा प्रकारच्या सामाजिक व पर्यावरणीय समस्याचे प्रमुख कारण लोकसंख्या वाढ आहे. आज रोजी मानवाला या सर्व प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. दिवसेंदिवस या समस्या गडद होत चालल्या आहेत. पर्यावरणाचे महत्त्व मानवाला आजही अनन्यसाधारण असेच आहे. प्रदूषणाला आळा घालण्यासाठी व सामाजिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी संशोधकांनी जालना शहरातील लोकसंख्या वाढीचा सामाजिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास ही समस्या संशोधनासाठी निश्चित केली आहे.

जालना जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय शेती असून इतर जिल्ह्याप्रमाणे जालना जिल्ह्यातही औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झालेले आहे. कारखानदारी, लघु उद्योग, कुटिरोद्योग इत्यादी व्यवसाय चालतात. तसेच जालना जिल्हा बी-बियाणे क्षेत्रात अग्रेसर आहे. स्टील क्षेत्रातही जिल्ह्याचे नाव जागतिक स्तरावर पोहोचले आहे. औद्योगिकीकरण हे प्रामुख्याने जालना शहरात केंद्रित झाल्यामुळे उद्योगाची वाढ झपाट्याने होत आहे. मोठमोठे उद्योग असल्यामुळे लोकसंख्या मोठ्या प्रमाणात या ठिकाणी स्थायिक झाली आहे. त्यामुळे शहरात प्रदूषणाची समस्या, झोपडपट्टी, बेरोजगारी, गुन्हेगारी, पाण्याची समस्या, वायू प्रदूषण, जल प्रदूषण प्रदूषण, वाहतुक समस्या इ. समस्या निर्माण झाल्या आहेत. एकंदरीत जालना शहरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढीमुळे समस्या निर्माण झाल्या आहेत.

**समारोप :**

जालना शहरातील लोकसंख्या वाढीचा परिणाम पर्यावरणीय घटकावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. लोकसंख्या वाढली की ती आपोआपच रोगराई, दुष्काळ, तापमानवाढ, प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते.

**निष्कर्ष :**

१) लोकसंख्या वाढीचा परिणाम मानवी जीवनावर होतो.
२) मानव निर्देशांकात घट दिसून आली.
३) प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात वाढ झाली.
४) मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे.
५) लोकसंख्या वाढीमुळे शहरीककरणाला गती प्राप्त झाली.

**ग्रंथ सुची :**

१) चंदना, आर. सी. (१९९४) जनसंख्या भूगोल, कल्याणी पब्लिकेशर्स, नई दिल्ली
२) डॉ. दा. धों. काचोळे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
३) इराक भरूचा, पर्यावरण अध्ययन, ओरियंट ब्लॅकस्वान
४) https://jalna.gov.in
५) https://shodhganga.inflibnet.ac.in
६) https://agricoop.nic.in
७) https://ndpublisher.in
8) https://mr.wikipedia.org/s/6ww